दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.२ ऑगस्ट२०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 2 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 247 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# लवकरच एसटीचे रिटेल इंधन विक्रीत पदार्पण परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

## केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त व्यावसायिक भागीदारीतून प्रकल्प कार्यान्वित होणार

**मुंबई (वृत्तसंस्था)**–उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करण्याच्या हेतूने केंद्र व राज्य सरकारच्या व्यावसायिक भागीदारीत एसटी महामंडळ राज्यभरात स्वतःच्या जागेवर विविध ठिकाणी व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल आणि डिझेल विक्रीचे रिटेल विक्री (किरकोळ विक्री) पंप सुरू करीत असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती अत्यंत नाजुक आहे. अशा परिस्थितीमध्ये केवळ प्रवासी तिकीट विक्रीतून मिळणाऱ्या महसुल वर अवलंबून राहणे श्रेयस्कर नाही. त्यासाठी उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे. गेली ७० वर्षापेक्षा अधिक काळ एसटी महामंडळ इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल कंपन्यांच्या कडून डिझेल इंधन विकत घेत आहे. सध्या २५१ ठिकाणी एसटीच्या स्वतः च्या जागेवर पेट्रोल पंप उभारले असून या द्वारे केवळ एसटीच्या बसेस साठी डिझेल इंधनाचे वितरण होते. अर्थात , पेट्रोल पंप चालवणे आणि त्याचे देखभाल करण्याचा उत्तम अनुभव एसटी महामंडळाच्या पाठीशी आहे. त्यामुळे भविष्यात केंद्र सरकारचे सार्वजनिक उपक्रम असलेल्या इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या ऑइल विक्री करणाऱ्या कंपन्यांशी व्यावसायिक करार करून सर्वसामान्य ग्राहकांसाठी पेट्रोल आणि डिझेल व तत्सम इंधन विक्री करणारे पंप उभा करणे प्रस्तावित आहे.

असे पेट्रोल पंप हे रस्त्यालगत व व्यावसायीक दृष्ट्या मोक्याच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यभरातील एसटी महामंडळाच्या स्वतःच्या ज्या जागा आहेत, त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून अशा २५ बाय ३० मीटर जागा निश्चित करण्यात येत आहेत. या ठिकाणी एसटी महामंडळाचे केवळ इंधन विक्रीच नाही तर रिटेल शॉप देखील उभारले जाणार आहेत. त्यामुळे येथे इतर व्यवसायाला देखील पूरक संधी उपलब्ध होईल! यातून एसटी महामंडळाला सार्वजनिक भागीदारीत चांगला महसूल देखील मिळू शकतो.


मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या केंद सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील इंधन विक्री करणाऱ्या कंपन्यांशी राज्य शासनाचा अंगीकृत उपक्रम असलेले एस टी महामंडळाशी व्यावसायिक भागीदारीचा करार करण्यात येईल! अर्थात , हा करार एका अर्थाने केंद्र आणि राज्य शासनाच्या दरम्यान होत असल्यामुळे मिळणाऱ्य उत्पन्नाच्या वितरणामध्ये पारदर्शकता राहील. या साठी संबंधित कंपन्यांनी राज्यभरात एस टी महामंडळाच्या सर्व जागांचे व्यावसायिक सर्वेक्षण करून २५१ ठिकाणी असलेल्या पेट्रोल पंपाचे एसटी महामंडळाच्या स्वतःच्या नव्या व्यावसायिक दृष्ट्या मोक्याच्या २५ बाय ३० मीटर जागेवर स्थलांतर केले जाईल, जिथे एस टी महामंडळाला स्वतःच्या बसेस साठी इंधन भरण्याची सोय असेल याचबरोबर सर्वसामान्य ग्राहकाला देखील किरकोळ इंधन विक्री करणे शक्य होईल.अशा पद्धतीचे ' पेट्रो –मोटेल हब उभा करण्याचा मानस व्यक्त केला आहे.भविष्यात व्यावसायीक इंधन विक्रीतून सर्वसामान्य ग्राहकाला विश्वासार्ह इंधन विक्री केंद्र एसटी महामंडळाच्या माध्यमातून उपलब्ध होईल, तसेच महामंडळाला देखील उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण होईल, असेही सरनाईक यांनी म्हटले आहे.



# जीवाचं रान करून फुलवलं उजाड माळरान;बिलाड्या बाबांची हिरवी क्रांती

## एकट्याच्या प्रयत्नांतून फुलवलं ६० एकर जंगल

**दिपक गोसावी | नंदुरबार**



सातपुड्यातील जंगल मोठ्या प्रमाणावर नष्ट होत असताना, असली (तालुका धडगाव) येथील ७० वर्षीय बिलाड्या जुगला वळवी यांनी गेली २४ वर्षे अहोरात्र कष्ट करून ६० एकर ओसाड माळरानाचे रूपांतर नंदनवनात केले आहे. स्वखर्चाने २५ हजारांहून अधिक झाडे लावून आणि ती जगवून त्यांनी पर्यावरणाचे रक्षण करण्याचा एक अनोखा आदर्श घालून दिला आहे.

एकेकाळी उजाड आणि बोडका असलेला असली परिसर आज हिरवागार झाला आहे. बिलाड्या बाबांनी गेल्या २४ वर्षांत २ हजार आंबे, ४ हजार सागवान, ५ हजार बांबू आणि ३५ हजार इतर औषधी गुणधर्माची झाडे लावली आहेत. यात त्यांनी गावठी आंबा, कडूनिंब, करंज, चारोळी, महू, आवळा यांसारख्या झाडांना प्राधान्य दिले आहे. पाण्याची सोय नसतानाही त्यांनी स्वतः चारी खोदून आणि डोक्यावरून पाणी वाहून रोपांना जगवले. जंगलातच झोपडी बांधून त्यांनी लावलेल्या रोपांचे हिंस्त्र प्राण्यांपासून संरक्षण केले.

बिलाड्या बाबांना त्यांचा मुलगा विजय वळवी यांची मोलाची साथ लाभली आहे. विजय वळवी, जे मुंबईत अन्न व औषध प्रशासनात वैज्ञानिक अधिकारी आहेत, ते दरवर्षी हजारोंच्या संख्येने विविध जातींची रोपे आणून देतात. त्यांनी यंदाही १० किलो बांबूच्या बियांची लागवड केली आहे.

बिलाड्या बाबांनी ज्या वनविभागाच्या जागेवर हे कार्य केले आहे, त्या जागेच्या मालकी हक्कावरून काही अडचणी येत आहेत. बाबांच्या कुटुंबीयांनी वनविभागाकडे मानवी दृष्टिकोनातून विचार करण्याची आणि बाबांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याची मागणी केली आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी असे प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या बाबांना सरकार आणि सामाजिक संस्थांकडून मदतीची अपेक्षा आहे.विजय वळवी यांनी गावातील लोकांनाही या पर्यावरण संवर्धनाच्या कामात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, वडिलांनी हा डोंगर हिरवा करण्यासाठी जीवाचे रान केले आहे, आता या कार्याला बळ देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

बिलाड्या बाबांचे हे कार्य केवळ वृक्षारोपण नाही, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी एक प्रेरणादायी संदेश आहे. त्यांचे कष्ट आणि निसर्गावरील प्रेम हे आजच्या काळात एक दुर्मिळ उदाहरण

# अखेर नीता अंधारे यांची बदली बीड शहर बचाव मंचाचे यश

## अखेर अंधार हटला.. परंतु या अंधारात काय काय घडले याची सखोल कसून तपासणी व्हावी ही बीड शहर बचाव मंचाची मागणी

**बीड | प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची बदली करण्यात आली आहे. यांची बदली करण्यात यावी अशी मागणी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सातत्याने लावून धरण्यात येत होती. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना वारंवार भेटून बीड शहर बचाव मंचाच्या वतीने निवेदने देण्यात आलेली आहेत. नगरपालिकेचा गलथान कारभार व त्यामुळे नागरिकांनाचे होत असलेले हाल याबद्दल प्रशासनाला सातत्याने अवगत करून देण्यात आलेले आहे. मुख्याधिकारी नीता अंधारे यांची जरी बदली झाली असली तरी त्यांच्या कार्य काळामध्ये झालेल्या सर्व कामकाजांची सखोल कसून तपासणी करण्यात



यावी तसेच त्यांच्या कार्य काळामध्ये नगरपालिकेच्या माध्यमातून केला जाणारा विकास पूर्णपणे का ठप्प झाला होता याची कारणे जनतेपुढे आली पाहिजेत. नीताताई अंधारे यांच्या डोक्यावर कोणा कोणाचा हात होता व त्यांची कोणत्या राजकीय पुढार्यांची सांठ-गाठ होती हेही उजेडात येण्याची गरज आहे. अंधारे यांच्या काळामध्ये आलेले निधी व नगरपालिके कडे जमा होणारा वसुलीचा पैसा हा कोणाच्या सांगण्यावरून कशा पद्धतीने वापरण्यात येत होता हेही जनतेपुढे येणे तितकेच गरजेचे आहे. येणारे नवीन मुख्याधिकारी लवकरच नगरपालिकेचा कार्यभार हाती घेतील व त्यांच्याकडून चांगला कारभार होईल अशी अपेक्षा आपण सर्वजण सर्व स्तरातून मिळून बीडची जनता म्हणून नवीन येणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांकडून करत आहोत.बीड शहराच्या व बीड नगरपालिकेच्या दुर्दशेविषयी तसेच शहरातील दयनीय परिस्थिती विषयी येणाऱ्या नवीन मुख्याधिकाऱ्यांना बीड शहर बचाव मंच अवगत करून दिल्याशिवाय राहणार नाही.

# महाराष्ट्र विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीची नवोदयसाठी निवड

**परळी | प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून ओळख असलेल्या मोहा येथील महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थ्यांनी कु.तेजस्विनी नीलकंठ सलगरे हिची नवोदय विद्यालयाकरिता निवड झाली आहे.



महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन करत आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. शाळेतील इयत्ता ९ वि वर्गात शिक्षण घेत असलेली कु.तेजस्विनी नीलकंठ सलगरे हिची नवोदय विद्यालयकरिता निवड झालेली असून तेजस्विनी सलगरे ही इयत्ता ५ वि आणि ८ वि वर्गाची स्कालरशिप परीक्षा, ८ वि वर्गाची एनएमएमएस या सर्व स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेली आहे. या शैक्षणिक वर्षात शाळेतील दोन विद्यार्थिनी नवोदय विद्यालय प्रवेशकरिता पात्र झाल्या असून स्कालरशिप, एमटीएस, एनएमएमएस यासारख्या विविध स्पर्धा परीक्षेत शाळेतील असंख्य विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. कु.तेजस्विनी सलगरे हिच्या या यशाबद्दल तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव एड.अजय बुरांडे, सर्व संचालक मंडळ, शाळेचे प्राचार्य मुरलीधर बोराडे, शालेय प्रशासन, स्पर्धा परीक्षा विभागाचे सर्व सदस्य यांनी तिचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# परळीत दहशत माजविणारी मोठी टोळी अजूनही सक्रिय: खा.बजरंग सोनवणे

**बीड | प्रतिनिधी**

परळीत महादेव मुंडे यांची हत्या होते परंतु २१ महिन्यात पोलीसांना आरोपी सापडत नाहीत. आरोपी पोलीसांच्या नाकावर टिच्चून परळीत फिरतात. हे कोणाच्या आशीर्वादाने चालते. परळीत ज्याला मारले त्यांच्यावरच खोटे गुन्हे दाखल केले जातात, त्यांनाच जेलमध्ये टाकले जाते. परळीत दहशत माजविणारी अजूनही मोठी टोळी बाहेर सक्रीय असल्याचा आरोप खा.बजरंग सोनवणे यांनी केला.बीड येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत महादेव मुंडे यांच्या कुटूंबियांना न्याय देण्याच्या लढ्याची दिशा ठरविण्यासाठी सर्वधर्मिय बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागर, आ.प्रकाश सोळंके, शिवसेना जिल्हाप्रमूख सचिन मुळूक, अनिल जगताप, बाळा बांगर, कुंडलिक खांडे, संतोष जाधव, हनुमान



मुळीक, शेख शफीक, राजाभाऊ फड यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, महाराष्ट्रात जिथे अन्याय होतो, तिथे मनोज जरांगे पाटील आणि जिथे पाटील तिथे आम्ही उभा आहोत. आज महादेव मुंडे यांची पत्नी आपल्या सर्वांची ही बहीण २१ महिन्यापासून न्याय मागत आहे. त्यांच्या मागणीचा कोणी विचारत नाही. आज काही खून समोर आले आहेत. परंतु त्यांच्या मारेकऱ्यांना अटक होत नाही. मग मुख्यमंत्री काय करतात. परळीत तेच मारणार आणि तेच खोटे गुन्हे दाखल करत आहे. यामुळे कोणी तरी समोर येऊन बोलणे आवश्यक आहे. बाळा बांगर यांनी पुढे येऊन मांडणी केली आहे. काल मुख्यमंत्र्यांनी एसआयटी स्थापन केली पण त्याची ऑर्डर येईपर्यंत त्यांचे काही खरे मानू नका. एसआयटीमध्ये पंकज कुमावत आले तर दूध का दूध, पाणी का पाणी होईल. दरम्यान, कालपासून महादेव मुंडे प्रकरणात काही आरोपींना अटक झाल्याचे सांगितले जात आहे. परंतु कोणालाही अजून अटक झाली नाही. पोलीस यंत्रणाच अशी अफवा पसरवित असावी. परळीतील पोलीस गेंड्याचे कातडे पांघरून फिरत आहेत. केवळ पोलीस अधिक्षक आणि जिल्हाधिकारी बदलून चालणार नाही तर खालची यंत्रणा देखील बदलली पाहिजे. आज सुद्धा परळीची टोळी सक्रिय आहे. जेलमध्ये देखील त्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. बीडचा खासदार म्हणून मी कायम या लढ्यात सोबत आहे. मनोज जरांगे पाटील हे देतील तो आदेश पाळून आम्ही काम करू, असा शब्दही बजरंग सोनवणे यांनी दिला.

संपादकीय

# ‘दिव्या’ विजेती

भारतात उदारीकरणाचे पर्व सुरू झाल्यानंतर सारे चित्र पालटले आणि महिलांची सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून भाग घेण्याची चढाओढ सुरू झाली. आता जागतिक बुद्धिबळ स्पर्धेतही भारतीय महिलांनी आपला झेंडा उंचच ठेवला आहे. जॉर्जियातील बाटुमी येथे सुरू असलेल्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी यांच्यात पहिला डाव बरोबरीत सुटला; परंतु त्यानंतर टायब्रेकरमध्ये महाराष्ट्राच्या दिव्या देशमुखने कोनेरू हम्पीला नमवत विश्वचषकावर आपले नाव कोरले. भारतासाठी ही गौरवास्पद बाब आहे. अंतिम फेरीत भारताच्याच दोन्ही महिला एकमेकांसमोर होत्या. त्यामुळे कुणीही जिंकले असते तरी चषक भारताकडेच येणार होता. यावरून ही बाब स्पष्ट झाली की, भारतीय महिला क्रीडापटू आपला झेंडा उंचावण्यासाठी सदैव तत्पर असतात.हा सामना ऐतिहासिक होता याचे कारण असे की, दोन्ही भारतीय महिला सुवर्ण आणि रौप्य चषकासाठी लढत होत्या. ही स्पर्धा २०२६ च्या फिडे बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्रता फेरीची लढत समजली जाईल. भारतीय महिलांसाठी हा क्षण ऐतिहासिक आहे, कारण या पूर्वी कोणत्याही महिलांनी बुद्धिबळ स्पर्धेत असे यश मिळवले नव्हते. कोनेरू हम्पी ही आंध्र प्रदेशची तर दिव्या देशमुख ही नागपूरची. दोघींनीही आपल्या अगोदरच्या सामन्यात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. भारतीय महिलांचे कौतुक करत असतानाच एक बाब मात्र स्पष्टपणे जाणवते की, आमच्या महिलांनी सर्व क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. पुरुषांइतक्याच स्त्रिया क्रीडा विश्वातही अढळ स्थान निर्माण करू शकतात हे या दोघींनी दाखवून दिले आहे.

अर्थात महिला बुद्धिबळ विश्वात अजून खूप मागे आहेत. १९८० पासून त्या बुद्धिबळ क्रीडा विश्वात आहेत पण फार थोड्यांनी अव्वल बुद्धिबळ स्पर्धेतील विजेते म्हणून झेप घेतली आहे. भारतात महिलांप्रती असलेली एकप्रकारे तुच्छ भावना सर्व खेळांमध्ये आहे. त्यात क्रिकेटमध्ये तर जास्तच आहे. पण आता महिला क्रिकेट खूप लोकप्रिय झाले आहे. बुद्धिबळ स्पर्धा पाहण्यासाठी जॉर्जिया येथे काल भरपूर प्रेक्षक जमले होते आणि ते दिव्या आणि कोनेरू हम्पी यांना चिअरअप करत होते. हे खूप आश्वासक चित्र आहे. एक काळ असा होता की, महिला या बुद्धिबळ स्पर्धा खेळण्यास शारीरिकदृष्ट्या सक्षम नाहीत असे समजले जात होते. आज अशी परिस्थिती राहिली नाही आणि ऑलिम्पिक असो की बुद्धिबळ असो, सर्वच क्षेत्रातील पुरुषांची मक्तेदारी मोडून काढण्यात महिला यशस्वी झाल्या आहेत. या सामन्यात कोण जिंकले किंवा कोण हरले हे महत्त्वाचे नाही. महत्त्वाचे आहे की, महिलांनी जबरदस्त झेप घेतली आहे आणि तिचे ऐतिहासिक महत्त्व आहे. या स्पर्धेतून ५० हजार अमेरिकन डॉलर भारतात येणार आहेत. त्यामुळे मिळणारे मानधनही महिलांसाठी प्रेरणादायी ठरू शकते. काही भारतीयांचे मत असे आहे की, अशा स्पर्धा तरुण मुलींना नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करण्यासाठी प्रेरणा देतील. महिला गट आणि पुरुष गट स्पर्धेतील येणारा पैसा यात खूप फरक असतो. क्रिकेटमध्ये तर पुरुषांच्या स्पर्धांच्या तुलनेत महिलांना मिळणारे मानधन यातील तफावत पाहिली तर डोके चक्रावून जाते. पण बुद्धिबळ स्पर्धेत एवढी रक्कम येणार आहे हे पाहून अनेक महिला बुद्धिबळ खेळाकडे आकर्षित होतील. दिव्याच्या या अविस्मरणीय विजयामुळे भारतीय महिलांची बुद्धिबळासाठीची क्रेझ आणखी वाढेल यात शंका नाही.

भारतात अजूनही ग्रँडमास्टर्स फार कमी आहेत. २०२३ च्या आकडेवारीनुसार फक्त २३ महिला ग्रँडमास्टर्स होत्या. अनेक सनातनी आई–वडील आपल्या मुलींना बुद्धिबळाकडे वळू देण्यास नाखूश असतात. ही एक अडचण आहे. तरीही या सर्व परिस्थितीवर मात करून फिडे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेतील विजेतेपद भारतातील महिलांचे सहभागाचे चित्र बदलेल अशी आशा वाटते. पाच वेळा विश्वविजेता झालेला विश्वनाथन आनंद म्हणाला की, दिव्या देशमुख हिने फार मोठी प्रगतीची झेप घेतली आहे. ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांच्या मतानुसार, दिव्या कधीही नवीन प्रयोग करण्यास घाबरली नाही. दिव्यासाठी ही एक जबरदस्त मोहीम होती, कारण महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी ती पहिली होती. ३८ वर्षीय कोनेरू ह्म्पीच्या निम्म्या वयाच्या दिव्याने घेतलेली झेप अनेकांना प्रेरणादायक आहे. दिव्या आणि हम्पी यांच्यातील हा सामना असंख्य किशोरवयीन तरुणींसाठी प्रेरणादायक ठरेल आणि दिव्याच्या म्हणण्यानुसार सोप्या पद्धतीने विजय मिळवण्यात काय अर्थ असतो, विजय मिळवला पाहिजे तो तगड्या प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळवून. तिच्या या मानसिकतेमुळेच आज तिने चिवट लढतीनंतर विश्वचषकावर नाव कोरले आहे. ती अत्यंत सकारात्मक पद्धतीने खेळते आणि बुद्धिबळाकडे पाहण्याचा हाच दृष्टिकोन महत्त्वाचा असतो आणि तो दिव्याला इतर खेळाडूंपेक्षा वेगळा करतो. दिव्या आधीच ‘कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरली आहे, जे बुद्धिबळ विश्वविजेतेपदाच्या वाटचालीतलं एक महत्त्वाचं पाऊल आहे. दिव्या देशमुख आता केवळ वर्ल्डकप विजेतीच नाही, तर तिने या ऐतिहासिक विजयासोबत ग्रँडमास्टरचा मानही मिळवला आहे. दिव्याने अनुभवी आणि उच्च मानांकन असलेल्या कोनेरू हम्पीचा पराभव करत हे प्रतिष्ठेचे विजेतेपद आपल्या नावे केले. असे विजेतेपद पटकवणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली आहे.



**आम आदमी पार्टीच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन बीड बीड जगाला शिकवण देणारे पृथ्वी ही शेषनागाच्या पानावर तरत नसून कष्टकऱ्यांच्या कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या कष्टाण्यावर तरते अशी ही जगाला शिकवण देणारे साहित्यरत्नं मा.आण्णा भाऊ साठे यांना आम आदमी पार्टीच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे जिल्हा कोषाध्यक्ष कैलास चंद पालीवाल जिल्हा बॉडी सदस्य ज्ञानेश्वर माऊली शिंदे शहर अध्यक्ष सय्यद सादेक तालुका अध्यक्ष कृष्णा पंडित कृष्णा जगताप शहर सचिव मिलिंद पाळणे इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# सुरक्षेसाठी विमा: शेतकऱ्यांच्या न ये कामा..



कल्लाप्पा हा अल्पभूधारक शेतकरी. आपल्या एकरभर शेतातून कुटुंबाच्या रोजच्या कौटुंबिक गरजा भागवणारे उत्पादन घ्यायचा. पावसाच्या पाण्यावर अवलंबून वर्षांचा काही काळ त्याला पीक घ्यावे लागायचे. काळ बदलला तसे आपल्या पिकाचा विमा उतरवून पिकाच्या उत्पादनाचे संरक्षण मिळण्यासाठी शासनाने पीक विमा योजना सुरू केल्या. त्याचा फायदा कल्लाप्पाने घ्यायचे ठरवले आणि आपल्या पिकाचा विमा उतरवला. दुर्दैवाने पावसाने कहर केला आणि हाताशी आलेले पीक वाया गेले आणि कल्लाप्पाला अतोनात नुकसान झाले. डोळ्यांदेखत पीक वाहून जाताना पाहून त्याला अतीव दुःख झाले, पण आपण पीक विमा योजनेचा हप्ता भरला आहे तेव्हा आपल्याला भीती नाही या समजुतीने कल्लाप्पा निश्चिंत होता. त्याच्या पीक विम्याच्या अंतर्गत विमा कंपनीने सर्वेक्षण केले. एके दिवशी टपालाने त्याला पीक विम्याचा धनादेश मिळाला तेव्हा त्याला हसावे की रडावे हे कळत नव्हते. धनादेश रु. १२०० चा होता. आपले हजारो रुपये पाण्यात गेले, बी–बियाणांचा खर्च, खतांचा/ मजुरीचा खर्च हे सारे खर्च लक्षात घेता किमान ७५ हजार खर्च झाले होते आणि पीक हाताशी आलं असतं तर कमीतकमी तीन लाख रुपये मिळाले असते. आता या १२०० रुपयांत काय करायचे. मुलांच्या शाळेचा, मुलीच्या उच्चशिक्षणाचा खर्च त्याच्या डोळ्यांसमोर नाचू लागला. वयोवृद्ध आई–वडील, त्यांचे औषधपाणी हे कसे करायचे याची त्याला चिंता वाटू लागली. आपल्या दैनंदिन जीवनात विमा हे सुरक्षेचे साधन मानले जाते. वैयक्तिक आयुष्याचा विमा, वाहनाचा विमा, इमारतीचा विमा, मालवाहतुकीचा विमा, आरोग्य सुविधांचा विमा (मेडिक्लेम) हे सर्वसाधारण प्रकार आपण पाहत आलो. आता सध्या तर नवीन मोबाइल घेतला तरी त्याचा विमा उतरवला जातो, जेणेकरून पुढे होणारी तूट–फूट त्या विम्याच्या रकमेतून वसूल करता आली पाहिजे हा उद्देश; परंतु अशा विम्याच्या रकमेत अवास्तव कपात करणाऱ्या विमा कंपनीला मिळालेला धडा आज आपण पाहूया. गोष्ट आहे

२०१७–१८ या वर्षातील. महाराष्ट्राच्या परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्यासाठी नियत केलेल्या पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत आपल्या रब्बी हंगामातील पिकांचा विमा उतरवला. दुर्दैवाने १२ फेब्रुवारी २०१८ रोजी झालेल्या गारपिटीने शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले. शासनाच्या महसूल विभागाने १००% नुकसानीचे नियमित पंचनामे केले आणि त्याचा अहवाल विमा कंपनीस प्राप्त झाला; परंतु नॅशनल इन्शुरन्स कंपनीने विम्याची रक्कम देण्यास टाळाटाळ केली किंवा काही बाबतीत तर विम्याचा दावा फेटाळला. काही शेतकऱ्यांना अत्यल्प मोबदला/भरपाई मिळाली जी त्याने कोणताही प्रतिरोध न करता स्वीकारली. विमा कंपनीच्या या पवित्र्याने शेतकरी हवालदिल झाले आणि त्यांनी जिल्हा ग्राहक मंचाकडे विमा कंपनीविरुद्ध तक्रार नोंदवली. जिल्हा ग्राहक मंचाने शेतकऱ्यांच्या नुकसानीचा दावा ग्राह्य मानून शेतकऱ्यांना पूर्ण नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. नॅशनल इन्शुरन्स कंपनीने याविरुद्ध राज्य ग्राहक संरक्षण आयोगात धाव घेतली. जिथे शेतकऱ्यांचा दावा काही अंशी फेटाळत. इन्शुरन्स कंपनीच्या बाजूने निकाल दिला. या निर्णयाने उद्विग्न झालेल्या शेतकऱ्यांनी राष्ट्रीय ग्राहक संरक्षण आयोगात दाद मागितली. या दाव्याचा विचार करताना राष्ट्रीय आयोगाने नॅशनल इन्शुरन्स कंपनीला फटकारले. विमा कंपनीने आपल्या प्रतिदाव्यात असे म्हटले होते, की शेतकऱ्यांना नुकसानीच्या नंतर विमाधारक शेतकऱ्यांनी ४८ तासांत त्यांचा दावा दाखल केला नाही. आयोगाने या दाव्याचा साकल्याने विचार करताना पंतप्रधान पीक विमा योजनेच्या कलम १०.५ कडे लक्ष वेधले ज्यात असे नमूद केले आहे, की शेतकऱ्यांना गारपीट, पूर अशा अवर्षणाच्या वेळी व्यक्तिगत नुकसान पाहणे अत्यंत गरजेचे आहे. ४८ तासांत दावा दाखल केला नाही अशा क्षुल्लक त्रुटींवर बोट ठेवून दावा नाकारणे सयुक्तिक नाही. याबाबतच्या मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आणि सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेल्या खटल्याचा संदर्भ देऊन असे म्हटले, की शासनाच्या सार्वजनिक हिताच्या अशा योजनांद्वारे नुकसानभरपाई देताना अशी संकुचित वृत्ती ठेऊ नये. विमा कंपनीने असाही दावा केला होता, की शेतकऱ्यांना बीज रोपण केल्याचा काही पुरावा दिला नव्हता. नैसर्गिक आपत्तीने झालेले नुकसान हे शासकीय यंत्रणांच्या पंचनाम्याने सिद्ध झालेले असताना आणि शेतकऱ्यांना विमा हप्ता भरलेला असताना क्षुल्लक त्रुटी दाखवत दावा फेटाळणे हे अनुचितच आहे, असेही आयोगाने आपल्या निकालात म्हटले. कित्येक शेतकऱ्यांना तर त्यांना इतकी कमी रक्कम देण्याबाबतचे स्पष्टीकरण देण्याची पारदर्शकता सुद्धा विमा कंपनीने दाखवली नाही. शेतकरी हा आपल्या राष्ट्राचा पोषणकर्ता आहे, त्याच्याबाबतीत अशी अनास्था बाळगणे चुकीचे आहे. पीक विमा यासारख्या शासकीय योजना या विमा कंपन्यांना फायदा कमावण्यासाठी आखलेल्या नसून या देशाचा प्रमुख अन्नधान्य उत्पादक शेतकरी आहे त्याचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी आहे.

राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सदस्य डॉ. इंदरजीत सिंग आणि डॉ. साधना शंकर यांनी हा पथदर्शी निवाडा करताना असेही नमूद केले, की शेतकऱ्यांना विमा कंपन्या या अशा शासकीय योजना राबवताना आपली तुंबडी भरतात आणि शेतकरी नागवला जातो. या दाव्याच्या निमित्ताने नॅशनल इन्शुरन्स कंपनी आणि इतर अशाच विमा कंपन्या चौकशीच्या रडारवर आल्या. ज्यांना शेतकऱ्यांनी विम्याचा हप्ता आणि राज्य किंवा केंद्र शासनाने सबसिडीची रक्कम भरली असून देखील त्यांनी शेतकऱ्यांचे दावे फेटाळत त्याच्यावर अन्यायच केला. आयोगाने असेही म्हटले, की या दाव्याच्या बाबतीत शेतकऱ्यांना त्यांची १००% नुकसानभरपाई त्वरित द्यावी अन्यथा आयोगाच्या आदेशाचा उपमर्द मानून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सकल राष्ट्रीय उत्पादनात मोलाचे योगदान देणारा शेतकरी हा सुद्धा ग्राहक आहे आणि त्याच्या हक्काचे संरक्षण हे झालेच पाहिजे हे सुद्धा यानिमित्ताने अधोरेखित झाले.

आपल्या दैनंदिन जीवनात विमा हे सुरक्षेचे साधन मानले जाते. वैयक्तिक आयुष्याचा विमा, वाहनाचा विमा, इमारतीचा विमा, मालवाहतुकीचा विमा, आरोग्य सुविधांचा विमा (मेडिक्लेम) हे सर्वसाधारण प्रकार आपण पाहत आलो. आता सध्या तर नवीन मोबाइल घेतला तरी त्याचा विमा उतरवला जातो, जेणेकरून पुढे होणारी तूट–फूट त्या विम्याच्या रकमेतून वसूल करता आली पाहिजे हा उद्देश; परंतु अशा विम्याच्या रकमेत अवास्तव कपात करणाऱ्या विमा कंपनीला मिळालेला धडा आज आपण पाहूया.

# विसर्जनाची अडचण



यंदाचा गणेशोत्सव आता जेमतेम महिन्यावर आलेला असताना मूर्ती विसर्जनाबाबत निर्माण झालेला पेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे संपुष्टात आला आहे. गणेशोत्सवाची वाढत चाललेली लोकप्रियता, जल्लोषात उत्सव साजरा करण्याची भक्तांची मानसिकता आणि त्यातूनच मूर्तींच्या उंचीबाबत निर्माण झालेली चढाओढ यातूनच गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच माघी गणेशोत्सवातील मूर्ती विसर्जनाबाबत समस्या निर्माण झाली होती. गणेश मूर्तींची वाढती उंची हा भाविकांच्या उत्साहाचा विषय असला तरी विसर्जन मिरवणुकीसाठी उंच मूर्ती मंडपातून काढणे, विसर्जनस्थळी वाजतगाजत नेणे, रस्त्यादरम्यान होणारी वाहतूक कोंडी, भाविकांचे नृत्य, गणेश भक्तिपर गाण्यांचा जल्लोष यामध्ये मंडपातून निघालेली मूर्ती वाहनातून विसर्जनस्थळी नेईपर्यंत मूर्ती सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांना करावी लागणारी तारेवरची कसरत हे एकप्रकारचे अग्निदिव्यच असते. दरवर्षी उंच मूर्ती विसर्जित करताना महापालिका कर्मचारी, सुरक्षा रक्षक, मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांना द्राविडी प्राणायम करावा लागतो.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या उंचीवरून वादास सुरुवात झाली आहे. पीओपीच्या मूर्तींना बंदी घालण्यात आली असली तरी विविध कारणांमुळे बंदीच्या अंमलबजावणीला अजून यश आलेले नाही. पीओपींच्या मूर्तींचा वाद हा अलीकडच्या गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण झालेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२५ पीओपीपासून बनवलेल्या मूर्ती आणि त्यांचे जलसाठ्यात विसर्जन करण्याविरुद्ध अंतरिम आदेश दिला आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. तथापि, न्यायालयाने आदेश देऊनही बाजारात पीओपीच्या मूर्ती आजही निर्माण होत आहेत. पीओपींच्या मूर्तींमुळे जलप्रदूषण होत असल्याने केंद्र सरकारने त्या मूर्तींच्या विसर्जनास वारंवार आक्षेप घेत शाडूच्या मूर्ती अथवा अन्य पर्यायांचा शोध घेण्यास यापूर्वीच सुचविले आहे. पीओपी पर्यावरणपूरक नाही. ते नद्यांमध्ये, पाण्यात विरघळू शकत नाही. त्यामुळे नद्या उथळ होतात. दुसरीकडे तलाव किंवा विहिरीत विसर्जन केले, तर नैसर्गिक पाण्याचे स्रोत खराब होतात. त्यामुळे या मूर्तींना नाही तर त्यांच्या विसर्जनाला व त्यातून निर्माण होणाऱ्या जलप्रदूषणाला केंद्र सरकारने वारंवार आक्षेप घेतला आहे. केंद्राचा हेतू पर्यावरणपूरक असला तरी अनेकजण रोजगाराला मुकतील, बेरोजगार होतील, अनेकांना कर्जबाजारी व्हावे लागेल अशा स्वरूपाचे आक्षेप घेत अनेकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. २०१२ पासून केंद्र सरकार पीओपी मूर्तींच्या विरोधात असले, तरी भाविकांची पीओपी मूर्ती खरेदी करण्याची मानसिकता, सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळाचाही याच मूर्ती खरेदीबाबतचा आग्रह यामुळे बाजारात पीओपीच्या मूर्तींवर बंदी येणे तूर्तास तरी शक्य दिसत नाही. धर्म आणि रूढी–परंपरांच्या नावाखाली पर्यावरणाचा विचार सोडून देणे आणि अविचारी पद्धतीने उत्सव साजरे करणे हे मुळात चुकीचे असले तरी आजही कोणी हे समजून घेत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. मूर्ती बनवणाऱ्यांना मूर्ती बनवण्यासाठी नैसर्गिक, विघटनशील आणि पर्यावरणपूरक कच्च्या मालाचा वापर करण्यास कोणाकडूनही प्रोत्साहित केले जात नाही. त्यातून पीओपी मूर्ती विसर्जनावरून केंद्र सरकार व मूर्ती उत्पादक यांच्यातील वाद उच्च न्यायालयात गेला.

न्यायालयाने या वादावर तोडगा काढला असला तरी हा तोडगा हंगामी स्वरूपाचा आहे. कायमस्वरूपी नाही. येणाऱ्या माघी गणेशोत्सवापर्यंतच या तोडग्याची मुदत आहे. सहा फुटांवरील गणेश मूर्तींचे समुद्रात, तर त्याखालील मूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. पाच फुटांपर्यंतच्या मूर्ती विसर्जनाबाबत कृत्रिम तलावामध्ये न्यायालयाने आदेश दिले असले तरी मुंबई तसेच मुंबई सभोवतालच्या ठाणे, कल्याण–डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल या एमएमआरए क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील जबाबदारी वाढविली आहे. पाच फुटांपर्यंतच्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची उंची व खोली याचाही स्थानिक प्रशासनाला प्राधान्याने विचार करावा लागणार आहे. गणपतीबाप्पा हा श्रद्धेचा विषय आहे. या मूर्तींचे विसर्जंन पारंपरिक पद्धतीने व्हावे असा त्यांचा आग्रह असला तरी गणेश भक्तांची अलीकडच्या काळात विसर्जनाबाबतची मानसिकता बदलली आहे, हा खरोखरीच बदल मानावा लागेल. वाहतूक कोंडी, परिसरापासून काही अंतरावर विसर्जन स्थळ, विसर्जन स्थळी असणारी गर्दी व त्यातून विसर्जनास होणारा विलंब आणि अनेकदा विसर्जनासाठी हमखासपणे असणारी वरुणराजाची हजेरी यामुळे घराजवळच उपलब्ध असणाऱ्या कृत्रिम तलावांचा पर्याय गणेश भक्तांनी स्वीकारला आहे. यात विसर्जनादरम्यान कृत्रिम तलावांमध्ये मूर्ती विसर्जित करण्यास चांगला प्रतिसाद मिळू लागला. पीओपींच्या मूर्ती विसर्जनावर न्यायालयाने दिलेला निर्णय ही केवळ वरवरची मलमपट्टी आहे. कोणत्याही समस्येवर ठोस तोडगा काढणे आवश्यक असते. अन्यथा त्या समस्येचा भस्मासूर होण्यास फारसा वेळ लागत नाही. पीओपींच्या मूर्तींमुळे पर्यावरणाची होणारी हानी, जलप्रदूषण या गोष्टींकडेही कानाडोळा करून चालणार नाही. त्या सत्यतेचा स्वीकार करण्याची मानसिकता आपणास स्वीकारावी लागणार आहे. मूर्ती मोठ्या उंचीची असो व छोटी असो, गणराया सर्वांमध्येच सामावलेले. भक्त गरीब असो वा श्रीमंत, गणराया आशीर्वाद देताना दुजाभाव दाखवत नाही. उंच मूर्ती हा प्रतिष्ठेचा विषय बनविण्याच्या संकल्पनेला कोठे तरी छेद द्यावाच लागेल. विषय श्रद्धेचा असला तरी त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांचाही कधी तरी विचार करावाच लागेल. नदी, तलाव, समुद्र या नैसर्गिक पर्यायांशिवाय अन्य पर्यायांचा शोध घेण्यास आपणास मर्यादा पडल्या आहेत. शाडूच्या गणेशमूर्तींचे लवकर विसर्जन होते. ती माती आपण शेतामध्ये, बागेमध्ये, उद्यानांमध्ये वापरू शकतो. पीओपी मूर्तींबाबत ते शक्य नाही. पीओपी मूर्तिकारांना माघी गणेशोत्सवापर्यंत न्यायालयीन निर्णयामुळे तूर्तास दिलासा मिळाला आहे.

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आदर्श स्मारकाच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या मिळेल-उपमुख्यमंत्री अजित पवार







**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आजच्या प्रगत महाराष्ट्रात विकसित देशाचा पाया क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी रचला. समाजसुधारणा, महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आदर्श या पूर्णाकृती स्मारकाच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या आपण सर्वांना मिळत राहील, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.शहरातील माळीवाडा वेस येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या चौथऱ्याचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, अभय आगरकर, सचिन जगताप, अक्षय कर्डीले, माणिकराव विधाते, नितेश भिंगारदिवे, माजी आयुक्त पंकज जावळे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, देशाला व राज्याला अनेक महापुरुष व महान स्त्रियांनी योग्य मार्ग दाखवला. त्यांच्याच विचारांचा आदर्श घेत समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन राज्य शासन काम करत आहे. आज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. स्वातंत्र्याचा, स्वाभिमानाचा अनुभव घेत त्या आपले योगदान देत असल्याचेही ते म्हणाले.राज्यातील महापुरुष व महान स्त्रियांची स्मारके उभारण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात येत आहे. यासाठी पावणेसातशे कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव याजन्मगावी १०० कोटी रुपये खर्च करून प्रत्येकाला अभिमान वाटेल असे भव्य स्मारक उभे केले जात आहे. जिल्ह्यातील महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे टप्याटप्याने पूर्णाकृती स्वरूपात उभारण्यात येतील, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी दिली.अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीत क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा व स्मारक उभारण्यात आले आहे. हे स्मारक स्त्री शिक्षणाचे प्रतीक म्हणून साकारण्यात आले असून, यामध्ये महात्मा फुले यांचा १० फूट उंचीचा आणि सावित्रीबाई फुले यांचा ९ फूट उंचीचा कास्य धातूपासून बनवलेला पुतळा आहे. त्याचबरोबर शाळेत जात असलेल्या ४ फूट उंचीच्या एका लहान मुलीची मूर्तीही समोर स्थापित करण्यात आली आहे. या तिन्ही शिल्पांचे एकूण वजन सुमारे १८०० किलोग्रॅम आहे.स्मारकाच्या परिसरात भिडे वाड्यातील प्रेरणादायी पाच भित्तीचित्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये स्त्री शिक्षण, हुंडा प्रथेविरोध, सती प्रथा, सामाजिक विषमता आणि फुले वाड्यातील जीवनदृष्यांचा समावेश आहे. पुतळा निर्मितीसाठी ५० लाख ६० हजार रुपये इतका खर्च आला आहे.सुशोभीकरणासाठी ४१ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळा केज येथे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**केज । प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती,लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व एम. टी. एस. ऑलंपियाड मधील गुणवंत विद्यार्थी सत्कार हा संयुक्त कार्यक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी. बी. यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.यावेळी मंचावर सेवानिवृत्त शिक्षक श्री. एस. ए. डापकर व ज्येष्ठ शिक्षक श्री. व्ही. बी. यादव यांची उपस्थिती होती.सर्व प्रथम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



एम. टी. एस.ऑलंपियाड स्पर्धेतील गुणवंत चि. नीरज आकाश पवार, चि. सुरज बालासाहेब घुले, कु.समर्थ रंजित जाधव,चि. सिद्धांत राजू वंजारे, चि. सार्थक दत्तात्रय पतंगे,चि. प्रथमेश लक्ष्मण चौरे,कु. आर्या अनिल निंगूळे, कु. भक्ती धनंजय सिरसट, कु.कृष्णाई बन्सी पाटोळे, कु.तनुजा लक्ष्मण ढाकणे, कु. सृष्टी जितेंद्र रोडे, कु. श्रेया गणेश सोळंके यांचे यथोचित अभिनंदन करण्यात आले.

विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु.ज्ञानेश्वरी प्रवीण देशमुख व कु.प्रगती सत्यप्रेम तपसे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम प्रसंगी शाळेतील सहशिक्षक श्री. जे. आर. मस्के यांनी विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जीवनपट उलगडून सांगितला. तर श्री. डापकर एस. ए. यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय समारोपात श्रीमती चाटे बी. बी. मनोगत व्यक्त करताना सर्व गुणवंतांचे अभिनंदन करत शुभाशीष व्यक्त केले पुढे बोलताना त्या म्हणाल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी महापुरुषांचा आदर्श घेऊन देशासाठी, समाजासाठी चांगले काम करावे.आदर्श नागरिक होण्यासाठी महापुरुषांचे विचार मोलाचे काम करतात.

कार्यक्रमाचे संचलन श्री. क्षीरसागर आर. एस. यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री. ए. डी. देशमुख, श्री. जी. बी. डिरंगे, श्रीमती अनिता जाधव, श्रीमती ध्वजा गायकवाड यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रम प्रसंगी सर्व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# तुलसी महाविद्यालयात टिळक स्मृतिदिन व अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन



**बीड । प्रतिनिधी**

तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे शुक्रवार, दि.१ रोजी साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे, डॉ.योगिता लांडगे, प्रा. अंकुश कोरडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी टिळक व साठे यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करत साठे यांच्या संघर्षमय जीवनकार्याला आणि प्रेरणादायी विचारधारेस कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थीही उपस्थित होते. त्यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवत आपल्या सामाजिक जाणीवेचे दर्शन घडवले

# ग्रामपंचायत कार्यालय चोंडी येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील चोंडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज दिनांक एक ऑगस्ट रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं यावेळी गंगाधर निळकंठ राव चोंडीकर सरपंच (प्रतिनिधी) बालाजी गुंडेराव बसापुरे, पांडुरंग कंधारे सोमनाथ पाटील रामराव आचेगांवे गुरुजी गणेश पाटील देवकते प्रकाश पाटील बसापुरे मुजाहिद शेख कौशिक किसवे दशरथ कंधारे ऑफरखा पठाण, तयबखान पठाण, नवाज पठाण ,पंडित पाटील देवकते, रमेश बसापुरे, कोंडीबा नागमोडे ,आप्पाराव चोंडीकर आप्पाराव देवकत्ते , राजू डोरनाळे शिवाजी कुंचलवार सुभाष बसापुरे नसीबसाब कासार हनुमंत भरडवार गंगाधर कांबळे यासह गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते

# पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**केज । प्रतिनिधी**

पवनराजे इंग्लिश स्कूल, केज येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन उत्साहात पार पडले. समाज परिवर्तनाचे प्रबळ साधन म्हणून कार्य करणाऱ्या साठे यांचे विचार आणि कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता.कार्यक्रमाचे अध्यक्ष पवनराजे इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष खंडेराव चौरे होते. त्यांनी आपल्या भाषणात आण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य विद्यार्थ्यांसमोर उलगडले. ते म्हणाले की, साठे हे केवळ साहित्यिक नव्हते तर ते खऱ्या अर्थाने समाजासाठी लढणारे युगपुरुष होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलित, गरीब, मजुरांच्या न्यायासाठी वाहिले.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मुख्याध्यापक अशोक मस्के सर व घुले सर होते. अशोक मस्के सर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की,



आजच्या पिढीने साठे यांच्या जाज्वल्य संघर्षातून प्रेरणा घेणे गरजेचे आहे. शिक्षण, मेहनत आणि सामाजिक भान हे त्यांच्या कार्याचे मूळ होते.

घुले सर यांनी आपल्या मनोगतातून साठे यांच्या साहित्याची सामाजिक जाणीवेची खोली उलगडली. त्यांनी सांगितले की, 'फकिरा', 'बारखान्या' यांसारख्या कादंबऱ्यांतून साठे यांनी सामाजिक विषमता, अन्याय आणि दडपशाहीविरुद्ध संघर्ष उभा केला.

कार्यक्रमात दळवे मॅडम यांनी देखील मनोगत व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता समाजाच्या वास्तव समस्यांकडे सजग दृष्टीने पाहिले पाहिजे. साठे यांच्या जीवनातून ते शिकता येईल. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अजय भांगे सर यांनी केले. त्यांनी आपल्या शैलीत कार्यक्रमाला एक सुसंवादात्मक स्वरूप दिले. तर कार्यक्रमाच्या शेवटी अश्विनी मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.या कार्यक्रमास चौरे मॅडम, डि.एस. चौरे सर, पठाण सर, पारखे मॅडम, केदार मॅडम, जाधव मॅडम, टेकाळे मॅडम, मुळे मॅडम, प्राची मॅडम, संजना मॅडम , अक्षता मॅडम, प्रगती मॅडम , अमृता मॅडम , लक्ष्मी मॅडम, सानिया मॅडम, विशाल सर, राऊत सर, काळे सर, निखिल भांगे सर ,यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात लोक शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लो.टिळक पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न

**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दि.१ऑगस्ट २०२५ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊसाठे जयंती व बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी साधेपणाने साजरी करण्यात आली

सर्वप्रथम अण्णाभाऊ साठे व बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भैरु चौधरी,मेजर विठ्ठल सौदागर,रविंद्र गायकवाड पेंटर, सुखदेव गायकवाड, अरुण गायकवाड यांची उपस्थिती होती.

अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते व परखड व्याख्याते डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड हे होते.प्रमुख पाहुणे भैरू चौधरी,रविंद्र गायकवाड पेन्टर,मेजर



विठ्ठल सौदागर यांनी थोडक्यात मनोगतव्यक्त केले.अध्यक्षीय समारोपात डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी तील व साहित्य क्षेत्रातील योगदान वाखाणण्या योग्य असल्याचे सांगून सामाजिक व भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळी तील योगदान वाखाणण्या योग्य असल्याचे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

यावेळी बाळासाहेब गायकवाड,सुखदेव गायकवाड,अरुण गायकवाड,माजीसरपंच रामराजे गायकवाड, नारायण गायकवाड, रमेश गायकवाड,सुधीर गायकवाड,रामराव गायकवाड,अनन्या गायकवाड,आरती गायकवाड यांच्यासह वाचक,हितचिंतक यांची उपस्थिती होती.

# ऊसतोड मजुरांच्या शेतकऱ्यांच्या लेकरांसाठी शिक्षणाचा उजेड देणं हेच आमचं ध्येय–संजय आंधळे, भाजपा नेते

**वडवणी। लोकपत्रकार भांगे**

पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी भाजपतर्फे सात दिवसांचा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाच्या सातव्या दिवशी बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी शालेय साहित्य वाटप आणि वृक्षारोपण करण्यात आले.

भाजप नेते संजय आंधळे म्हणाले, ऊसतोड मजुरांच्या लेकरांसाठी शिक्षणाचा उजेड देणं हेच आमचं ध्येय आहे. ही मुलं शिक्षणापासून वंचित राहू नयेत, म्हणून शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. शिक्षण हेच त्यांचं भवितव्य घडवणारं साधन आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तकं, दप्तर अशा शालेय उपयोगी वस्तूंचं वाटप करण्यात आलं. तसेच पर्यावरण रक्षणाचा संदेश देत वृक्षारोपणही करण्यात आलं. या छोट्याशा



उपक्रमातून मोठा सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमासाठी गावातील ग्रामस्थ, शिक्षक, पालक व भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजातील विविध स्तरातून या उपक्रमाचे कौतुक होत असून, संजय आंधळे आणि त्यांच्या टीमच्या उपक्रमशीलतेचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# शिक्षकांनी केलेल्या योग्य संस्कारामुळे भावी पिढी आदर्श घडते–बदामराव पंडित

## अर्जुन धुमाळ, महादेव डोंगरे यांचा हृदयसत्कार

**गेवराई । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये योग्य पद्धतीचा कायापालट करण्यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकांनी बालपणापासून विद्यार्थ्यांवर केलेल्या योग्य संस्कारामुळे भावी पिढी ही आदर्श घडते. शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या प्रत्येक शिक्षक प्रामाणिकपणे ग्रामीण भागातील विद्यार्थी घडवण्याचे काम करतो याचा अभिमान वाटतो. अर्जुन धुमाळ आणि महादेव डोंगरे हे दोघेही सेवानिवृत्त होत असताना त्यांच्या प्रति विद्यार्थ्यांच्या मनात किती आदर आहे हे पाहून मीही भारावलो असे गौरवोद्गार शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी व्यक्त केले.

शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित अहिल्याबाई होळकर विद्यालय खांडवी या शाळेतील शिक्षक अर्जुन धुमाळ आणि महादेव डोंगरे यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमास माजी सभापती पंढरीनाथ लगड, युवा नेते यशराज पंडित, चंद्रकांत शिंदे, सरपंच कैलास माने, माजी सरपंच भाऊसाहेब माखले, कैलास शिंदे, छत्रभुज नाईकवाडे, प्रकाश भोले, उपसरपंच पिंटू चव्हाण, प्रशासकीय अधिकारी प्रमोद देसले, मुख्याध्यापक जुगदार, इंजिनीयर कृष्णकुमार मेंढे, मुकुंद घाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सेवानिवृत्त शिक्षक अर्जुन धुमाळ आणि महादेव डोंगरे या दोघांचाही महावस्त्र देऊन सपत्नीक सत्कार माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना आपल्याच गावामध्ये शिक्षण मिळावे या उद्देशाने शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या अध्यक्षा सौ गिरीका पंडित यांनी ७ शाळा आणि एक महाविद्यालय सुरू केले. या शाळांमधून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज वेगवेगळ्या विभागात उच्चपदस्थ अधिकारी व कर्मचारी म्हणून काम करत आहेत. शिक्षणासोबत कला आणि क्रीडाचेही शिक्षण मिळाले पाहिजे हा उद्देश संस्थेने ठेवून मुला- मुलींना योग्य प्रशिक्षण दिले. त्यामुळे या दोन्ही क्षेत्रात ग्रामीण भागातील विद्यार्थी झळकताना दिसतात. यामध्ये सर्व शिक्षकांचे मोठे योगदान आहे. आज अर्जुन धुमाळ आणि महादेव डोंगरे हे दोन्ही शिक्षक सेवानिवृत्त होत आहेत मात्र विद्यार्थ्यांसोबत त्यांचे जुळलेले नाते पाहून मलाही अभिमान वाटला. यापुढेही त्यांनी विद्यार्थ्यांना सतत मार्गदर्शन करण्यासाठी वेळ द्यावा असे सांगून दोघांनाही भावी आयुष्य सुखी, समाधानी त्यासोबत निरोगी दीर्घायुष्य मिळो अशा शुभेच्छाही बदामराव पंडित यांनी दिल्या.



याप्रसंगी ताराचंद शेजुळ, बंडू डोंगरे, बळीराम कोठुळे, सोमनाथ धुमाळ, सुधाकर माळवे, प्राध्यापक चव्हाण, डॉ सुभाष ढाकणे, कृष्णा महाराज डोंगरे, भागवत गवंडी, शिवाजी धुमाळ, नारायण नाटकर, तात्यासाहेब शेळके, रमेश डोंगरे, उद्धव डोंगरे, नामदेव धुमाळ, सतीश देशमुख, शहादेव डोंगरे, आत्माराम गवारे, केशव डोंगरे, बाळराजे तळेकर, किशोर वाघमारे आदींसह संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक केशव तळेकर यांनी केले. सूत्रसंचालन दादाभाऊ उगलमुगले, किसान बांगर यांनी तर आभार प्रदर्शन बाबासाहेब ढाकणे यांनी केले.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी पाहिलेले स्वप्न प्रस्थापितांच्या नादी लागून पूर्ण होणार नाही–मिलिंद घाडगे



**परळी । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी पाहिलेले स्वप्न प्रस्थापितांच्या नादी लागून पूर्ण होणार नाही असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी केले.ते परळी बसस्थानकात आयोजित करण्यात आलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आगार प्रमुख अमोलजी गरकळ हे होते.तर प्रमुख वक्ते-वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे,प्रमुख पाहुणे-कामगार संघटनेचे नेते ,रमेशजी गीते, चव्हाण साहेब, साहेबराव रोडे, बळीराम दराडे हे होते.कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती-संघटनेचे नेते संभाजी घाडगे,बाळकृष्ण पिंटूळे, राठोड साहेब, सांगळे साहेब, बळवंत मॅडम, वंदनाताई कोराटे, खामकर मॅडम, कृष्णा तिरमले, मुंजाभाऊ उपाध्ये, आचार्य, अविनाश गायकवाड, प्रल्हाद मिसाळ, विशाल पारधे, सोमनाथ कांबळे, लालाजी कांबळे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश वाघमारे, यांनी केले तर प्रास्ताविक रमेशभाऊ गीते यांनी केले आभार प्रदर्शन चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाला परळी आगारातील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रमिकांचा कवी अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांना अभिवादन!

## अण्णाभाऊ शोषित वंचित आणि समाज क्रांतीचे प्रतीक–अँड.मनोज संकाये

**परळी वैजनाथ ।प्रतिनिधी**

शोषित-वंचितांच्या आवाजासह सामाजिक क्रांतीचे प्रतीक ठरलेले लोककवी अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती तसेच लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी परळी शहरात साजरी करण्यात आली. अँड. मनोज संकाये मित्रमंडळाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या परळी येथील बस स्टँड समोरील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.या कार्यक्रमात अँड. मनोज संकाये यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे स्मरण करून, त्यांनी दिलेल्या सामाजिक समतेच्या संदेशाचे महत्त्व पटवून दिले. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून आणि आंदोलनातून वंचितांचा आवाज बुलंद केला. त्यांच्या विचारांनी आजही अनेकांना प्रेरणा दिली आहे, असे संकाये यांनी नमूद केले.

कार्यक्रमात युवकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. पुतळा परिसर फुलांनी आणि फडकत्या झेंड्यांनी सजवून, जयघोषात साजरी झालेली ही जयंती, अण्णाभाऊंच्या सामाजिक लढ्याची आठवण करून देणारी ठरली.



यावेळी अनिल चौधरी, वैजनाथ केंद्रे, शिरीष सलगरे, प्रवीण रोडे, संतोष कांबळे,राजू वायबसे, अविनाश नागरगोजे, अजय मुंडे, शिवलिंग सलगरे, देवदास मुंडे ,वसंत मुंडे, परमेश्वर मुंडे,महादेव कांदे, वैजनाथ कांबळे, बालू गित्ते,अनिल कातकडे,विनोद रोडे,मुकुंद पारधे,अंकुश रोडे, परमेश्वर मुंडे अवि गायकवाड,विजय गवळी आदीसह मित्रमंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**महिला महाविद्यालय बीड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त व लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मा.आदित्य दादा पाटील, बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष मा. राहुल भैय्या सोनवणे, राजेसाहेब भाऊ देशमुख,श्री.प्रवीणकुमार शेप, नवनाथ बापू थोटे,तालुका अध्यक्ष गणेश बुदगुडे पाटील, प्रताप मोरे सर व आदी.**

# तोरणमाळ पर्यटन विकासाला चालना देण्या साठी जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांचा दौरा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ पर्यटनस्थळाच्या विकासाला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. त्यांनी सिताखाई पॉईंट, झिप लाईन, थीम पार्क, बोटॅनिकल गार्डन आणि इतर प्रमुख ठिकाणांचा आढावा घेतला.

या दौऱ्यादरम्यान, त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला (PWD) रस्ते दुरुस्त करण्याचे, वन विभागाला सफारीसाठी वाहने घेण्याचे, आणि होम स्टे प्रकल्पासाठी विद्युत जोडणी तातडीने देण्याचे निर्देश दिले. पर्यटन विकास कामांमध्ये समन्वय साधण्यावर भर देत स्थानिकांचे उत्पन्न वाढवणे, महिलांना स्वयंरोजगार देणे, आणि शाश्वत पर्यटन संधी निर्माण करणे हे या दौऱ्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. या भेटीमुळे तोरणमाळच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.



# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त डॉ.क्षीरसागर दांपत्याकडून अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी अभिवादन केले.

शहरातील अर्धाकृती पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी नगरसेवक गणेश वाघमारे, विनोद हातागळे, गोपाळ धांडे, अमोल पौळ, स्वप्नील हातागळे, प्रकाश कानगावकर, अमर विद्यागार, नाना मस्के, संगीताताई वाघमारे, मुन्ना गायकवाड, संजय वाघमारे, पांडुरंग सुतार, विशाल मोरे आदी उपस्थित होते. तसेच, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरातील रामतीर्थ परिसरातील अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी गोरख मोमीन, विशाल बोबडे, सागर पाटोळे, निलेश लोंढे, नितीन आरे, विजय रोकडे, अशोक धुताडमाल, संगीता बाबरे, संजीवणी कानडे, संगीता कांबळे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.



# कात्रीचे सरपंच संदीप वळवी यांना ग्राम रत्न पुरस्कार

**रविंद्र वळवी । मोलगी**

ग्राम विकासासाठी वेगवेगळे उपक्रम राबवणाऱ्या कात्री (ता.धडगाव) येथील धडाडीचे सरपंच संदीप वळवी यांनी नेहमीच विविध कामे राबवली, या उपक्रमशील सरपंच वळवी यांचा अखिल भारतीय सरपंच परिषदेमार्फत लोणावळा येथे ग्रामरत्न पुरस्कार देत गौरव करण्यात आला.

देशभरातील ग्रामपंचायतींसाठी आदर्श ठरणाऱ्या कात्री ग्रामपंचायतीतील गाव-पाड्यांच्या विकासासाठी सरपंच संदीप वळवी यांनी काही वर्षांपासून सातत्याने रोहयोची कामे राबवली, यातून रोजगार उपलब्ध होत असल्याने स्थलांतर थांबले. महफुले गोळा करणे, शेळीपालनसारख्या शेतीपूरक व्यवसायाला वळवी यांनी चालना दिली, आपल्या शेतकऱ्यांच्या माध्यमातून बहुगुणकारी भगरच्या उत्पादनात मोठी वाढ झाली. पाणी अडवा पाणी जिरवा उपक्रम राबवत सरपंच वळवी यांनी सुजलाम-सुफलाम परिसर निर्माण केला. कृषी विकासाच्या योजनांना मंजूरी मिळवत ग्रामपंचायत अंतर्गत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली. यासह अन्य शेकडो अभिनव असे विकासात्मक उपक्रम राबविले जात आहे. या सर्व संकल्पना सरपंच वळवी यांच्या दूरदृष्टीतूनच आल्या आहेत. या दूरदृष्टीची तथा विकासात्मक संकल्पनांची दखल घेत सरपंच वळवी यांना अखिल भारतीय सरपंच परिषदेमार्फत ग्राम रत्न पुरस्कार देत त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन, यशदा चे माजी महासंचालक तथा माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे, सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील व इतर मान्यवर उपस्थितीत होते.




## डोंगरे वस्ती येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन

# ज्ञानेश्वर पारायण, हरिकिर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्या : जिल्हाध्यक्ष पिंटू (भाऊ)डोंगरे

**वडवणी । लोकपत्रकार भांगे**

उपळी (ता. बडवणी) येथील डोंगरे वस्तीवर श्री. ज्ञानेश्वर पारायण डोंगरे वस्ती यांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दि. ३१ जुलै ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यान हा सप्ताह पार पडणार असून, श्रद्धावान भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक मंडळाकडून करण्यात आले आहे.या सप्ताहात श्रीज्ञानेश्वरी पारायण, संत तुकाराम महाराजांचे अभंगवाचन, तसेच नामवंत कीर्तनकारांचे प्रभावी कीर्तन होणार आहे. दररोज सकाळी पारायण, दुपारी प्रवचन, सायंकाळी कीर्तन आणि रात्री हरिपाठ/भजन असे कार्यक्रम नियोजित आहेत.सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे, शेवटच्या दिवशी दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत अपूर्व असा कीर्तन सोहळा महंत आप्पासाहेब महाराज चौरे यांच्या उपस्थितीत होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद ठेवण्यात आलेला आहे.



साप्ताहिक कीर्तनकारांची यादी खालीलप्रमाणे ३१ जुलै ह.भ.प. उध्दव महाराज चौरे, चांदपाट, १ ऑगस्ट ह.भ.प. केशव महाराज गंगाखेड,२ ऑगस्ट ह.भ.प. संतोष महाराज बनव पटोदा,३ ऑगस्ट ह.भ.प. बाबासाहेब महाराज मुंडे, चांदणी ,४ ऑगस्ट ह.भ.प. तुकाराम महाराज गोंडेवाडी, ५ ऑगस्ट ह.भ.प. दत्तात्रय महाराज सातळा,६ ऑगस्ट ह.भ.प. भगवान महाराज नांदूरघाट ,७ ऑगस्ट महंत आप्पासाहेब महाराज चौरे (विशेष कीर्तन व महाप्रसाद) मुख्य मार्गदर्शक: म.शे. चंद्रकांत मुंडे व म.शे. चौरे,आयोजक: समस्त गायकवडी मंडळी, डोंगरे वस्ती,संपूर्ण सप्ताहभर भाविकांसाठी विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील नागरिकांनी या भक्तिसंगीतात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077